

## 'राष्ट्रपति भवन म्हणजे एक तुरुंगच' झैलसिंग यांच्याबरोबर रंगलेल्या गप्पा

*२२ डिसेंबर १९८६*

राष्ट्रपतिपद काय किंवा राज्यपालपद काय, ही राजकारणाच्या भव्य दालनातील शोभेची झुंबरेच. गेल्या १३ डिसेंबर रोजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्याशी मनमोकळ्या अनौपचारिक गप्पा मारताना हे पुन्हा जाणवले. प्रेस असोसिएशनतर्फे वृत्तपत्र दिवस साजरा करण्यात आला तो राष्ट्रपतींसमवेत अल्पोपाहार आयोजित करून. राष्ट्रपति भवनाच्या आलिशान मोगल उद्यानात झालेल्या या कार्यक्रमात झैलसिंग तासभर गप्पा मारण्यात रंगून गेले. नुकतीच पावसाची सर येऊन गेलेली. त्यामुळे पाना-फुलांवर ताजीतवानी प्रसन्नता होती. झकास थंडीत हवेहवेसे वाटणारे सोनेरी ऊन हिरवळीवर पडलेले होते. या सुखद वातावरणाचा मूड गप्पांतही उतरलेला होता.

आपण एक मोठे लखलखणारे पण शोभेचेच झुंबर आहोत, याची जाण राष्ट्रपतींना आहे' याचा प्रत्यय येत होता. तरीही त्यांची मल्लिनाथी मोठी मार्मिक व वास्तवाचे भान असलेली होती. राष्ट्रपति भवन म्हणजे एक तुरुंगच वाटतो, असे झैलसिंग म्हणाले. स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी कारावास भोगलेला, तेव्हा त्या नि या तुरुंगाची तुलनाही त्यांनी केली. 'त्या तुरुंगात मी एकाच खोलीत होतो, तर या तुरुंगात अनेक खोल्या आहेत इतकेच. त्या तुरुंगातले पोलीस सलाम करत नसत, पण या राष्ट्रपति भवन नामक तुरुंगातील पोलीस मात्र मला सलाम ठोकतात,' असे सांगून ते म्हणाले की 'खरे तर राष्ट्रपतीइतके सलाम दुसऱ्या कोणालाच मिळत नाहीत!'

**पाच वर्षांची सजा**

राष्ट्रपति भवनातला 'कारावास' तुम्ही खुषीने पत्करला आहे, असे म्हणताच

झैलसिंग म्हणाले, 'स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळीही खुशीनेच तुरुंगात गेलो होतो. त्यावेळची हकीगत मोठी मजेशीर आहे. एक नेते कारावास भोगून आले होते. त्यांचे जोरदार स्वागत झाले. मी त्यांच्या प्रशंसेचे एक कवन म्हटले, तेव्हा त्यांनी मला शाबासकी दिली. स्वातंत्र्यासाठी कारावास भोगणाऱ्याचा मोठा सन्मान होतो, हे पाहून मला वाटले, आपल्यालाही तुरुंगवास घडावा. म्हणून मी काही प्रखर टीकेची भाषणे केली. माझ्यावर खटला भरण्यात आला. तो अकरा महिने चालला. मला वाटले फार तर वर्षभराची सजा होईल; परंतु पाच वर्षांची कारावासाची शिक्षा झाली.'

वा, राष्ट्रपतिपदाचा काळही पाच वर्षांचाच आहे. तेव्हा त्या तुरुंगात पाच वर्षे काढली, आता या तुरुंगात पाच वर्षे घालवता आहात, असे एका पत्रकाराने म्हणताच, 'मी मुख्यमंत्रीही पाच वर्षे होतो,' अशी पुस्ती झैलसिंग यांनी जोडली नि हशा उसळला.

झैलसिंग एकेकाळी स्वत: पत्रकार होते, त्याची साहजिकच यावेळी याद आली. 'खालसा सेवक' नावाचे एक मृत्युपंथाला टेकलेले वर्तमानपत्र त्यांनी १९५३ साली चालवायला घेतले. अमृतसरहून प्रकाशित होणाऱ्या या वर्तमानपत्राला जाहिरातीही चांगल्या मिळत होत्या. दोन वर्षे झैलसिंग यांनी ते चालवले. बातम्या देणे, त्यांची शीर्षके देणे वगैरे कामे ते करत असत. नंतर झैलसिंग दिल्लीला आले व हे वृत्तपत्र त्यांनी दिल्लीहून वर्षभर काढले. पण हळूहळू ते बंद पडले. 'मी आणि माझा शिपाई एवढेच कर्मचारी उरले तेव्हा ते बंद करावे लागले,' असे झैलसिंग यांनी सांगितले.

त्यावर मी त्यांना विचारले, 'तुम्हाला पत्रकाराची भूमिका आवडली की राजकारणी व्यक्तीची?' ते उत्तरले, 'आपण ज्या क्षेत्रात यशस्वी होतो ते क्षेत्र माणसाला आवडते. आता मी पत्रकार नाही व राजकारणीही नाही, मी राष्ट्रपती आहे.'

परंतु जून ८७ मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर काय करायची इच्छा आहे, पुन्हा पत्रकार बनाल की राजकारणी, असे विचारता ते हसत हसत म्हणाले, 'परमेश्वरच जाणे काय होईल, मला तर जिवंत राह्यचंय!' त्यांचे हे उद्‌गार सूचक व अर्थगर्भित होते. त्यामुळे क्षणभर गप्पा थबकल्या. झैलसिंग यांनीच पुढे म्हटले, 'माझ्यासारखी दुसरी कोणी गरीब व्यक्ती एकेक शिडी चढत या पदापर्यंत पोचली नसेल.'

## प्रभावी व्यंगचित्रे

मग पत्रकारांसंबंधी त्यांनी सर्वसाधारण मल्लिनाथी केली. 'काही पत्रकार चतुर असतात. ते कधी कधी सभेला जातच नाहीत; कारण तेथे नेते मंडळी काय भाषणे करणार, हे त्यांना ठाऊक असते. त्यामुळे सभेला न जाताच ते भाषणे लिहू शकतात. मला पत्रकारांनीच सहकार्य दिले. कधीही कोणाही पत्रकाराला लालूच देऊन मी बाळगले नाही,' असे ते सांगत असतानाच व्यंगचित्रकार रंगा राष्ट्रपतींचे एक व्यंगचित्र काढून त्यांची त्यावर स्वाक्षरी घेऊ लागले. तेव्हा, कधी कधी व्यंगचित्रे एवढी प्रभावी असतात की अग्रलेख वाचायची गरजच पडत नाही, असे मर्म त्यांनी सांगून टाकले.

मग विषय निघाला भाषणांचा. झैलसिंग यांचे वैशिष्ट्य असे की, बऱ्याचदा ते लिहून

आणलेले तयार भाषण बाजूला ठेवतात नि उत्स्फूर्त बोलतात. अशा त्यांच्या उत्स्फूर्त भाषणांत गमतीजमती असतात, हलकाफुलका विनोद असतो, एखादा शेर असतो आणि अत्यंत मार्मिक, वास्तववादी टिप्पणी असते. या नेत्याची पाळेमुळे मातीत रुजलेली आहेत, असे त्यांची उत्स्फूर्त भाषणे ऐकताना जाणवते, असे सांगून तुमची लेखी भाषणे ही प्रभावी नसतात, असे मी म्हणताच झैलसिंग मिश्कीलपणे म्हणाले, 'लेखी भाषण हे त्या व्यक्तीचेच विचार आहेत, असे मानायला लोक तयार होत नाहीत.' त्यांचा हा खोचक शेरा ऐकून पुन्हा मोगल उद्यानात हशाचे कारंजे उसळले. ते पुढे म्हणाले, 'लेखी भाषण वाचायचे म्हणजे अगदी यांत्रिक वाटते. पण काय करणार? कधी कधी लिहून दिलेले भाषणच वाचावे लागते. परदेश दौऱ्यावर मी लिहून दिलेली भाषणे वाचली, पण विदेशी नेत्यांशी चर्चा करताना संधी साधून मी उत्स्फूर्त बोलून गेलोही.'

राष्ट्रपतींना जशी मुबलक भाषणे करावी लागतात, कधी लिहून दिलेलेच वाचावे लागते, त्याचप्रमाणे त्यांना अनेक कागदपत्रांवर सह्या कराव्या लागतात. गेल्या पाच वर्षांत तुम्ही लाखो सह्या केल्या असतील नाही, अशी विचारणा करता ते म्हणाले, ''हो ना, पण मला एक उमगले की, खूप कामेही 'रुटीन' स्वरूपाची असतात. त्यासाठी सर्व फायली वाचण्याची गरज नसते.'' पण या रुटीन कामापायी नातेवाइकांना पत्रे लिहायला मिळत नाही याची त्यांना खंत वाटते. आपल्या मोठ्या भावाला पत्र लिहिण्याची त्यांची इच्छा होती, म्हणून त्यांनी कागद घेतला व पत्र लिहायला सुरुवातही केली. तेवढ्यात सचिवाने काही फायली आणल्या. नंतर काही मित्र आले. पत्र लिहायचे राहूनच गेले. तीन दिवस तसेच गेले आणि मग बातमी आली की, झैलसिंग यांच्या मोठ्या बंधूंचे निधन झाले आहे. त्यांना पत्र लिहिण्याची आपली इच्छा पुरी झाली नाही, याचे ग्यानीजींना फार दु:ख झाले.

तास होत आला होता. मावळतीचे रंग हिरवळीवर पसरू लागले होते. राष्ट्रपती सात महिन्यांनी निवृत्त होणार, याचीच जणू जाणीव त्यामुळे होत होती. हसत हसत प्रसन्न वदनाने राष्ट्रपतींनी पत्रकारांचा निरोप घेतला नि एक गप्पांची मैफील संपली.

### कलावंत मंडळी

राज्यसभेत साहित्य, संगीत, चित्रकला या क्षेत्रांतील अमृता प्रीतम, आर. के. नारायण, रविशंकर, एम. एफ. हुसेन अशी अतिरथी, महारथी मंडळी सदस्य आहेत. आपल्याच कलेच्या विश्वात धुंद होणाऱ्या या मंडळींना राजकारणाचे क्षेत्र हे बावरून टाकते, रुक्ष वाटते की त्यात ते रमतात हे जाणून घेण्याचे साहजिकच औत्सुक्य होते.



एकदा गेल्या अधिवेशनात संसद भवनाच्या कँटीनमध्ये भोजनाच्या टेबलावर माझ्या सोबत रविशंकर व आर. के. नारायण योगायोगाने बसलेले पाहून मी हरखून गेलो होतो. संगीतातील सुसंवादाची अनोखी जादू सतारीच्या तारांतून प्रसवणाऱ्या रविशंकर यांना राजकारणातला सूर अजून गवसायचा होता आणि नारायण यांनाही या नव्या विश्वाची जानपछान व्हायची होती.

गेल्या आठवड्यात नारायण यांची संसद भवनात गाठ पडली. त्यांच्या 'मालगुडी डेज' वर सध्या दूरदर्शनवर मालिका चालू असून ती खूपच लोकप्रिय झाली आहे. त्यात रंगवलेला कंजूष इसम आपल्याला कसा भेटलेला आहे, असे नारायण सांगू लागले. खासदाराला दिला जाणारा फ्लॅट अजून त्यांनी घेतलेला नाही. एका नातेवाइकाकडेच हे राहात आहेत. मी एकटा फ्लॅटमध्ये राहून काय करू, असे ते सांगत होते; तेव्हा मी म्हटले, 'तुम्हाला लेखनाला छान निवांतपणा, शांतपणा मिळेल की.' त्यावर आर. के. नारायण म्हणाले, 'मला लेखनाला शांतपणा चालतच नाही. आजूबाजूला आवाज, कोलाहल असला मी मग माझा लेखनाचा मूड असतो.' 'या दृष्टीने राज्यसभा तर एकदम उपयुक्त, कारण सतत कोणी ना कोणी सदस्य भाषण करत असतो, आरडा ओरडा चालू असतो; तेव्हा तुमच्या लिखाणाला अगदी सुंदर वातावरण निर्मिती आहे. तुम्ही सभागृहातच बसल्या बसल्या काही लिहिता काय?'' असे विचारता ते म्हणाले, ''अजून तरी सुरुवात केली नाही, पण करायचा विचार आहे.''

चित्रकार हुसेन यांनी सभागृहात बसल्या बसल्या स्केचेस काढायला सुरुवात केली आहे. सदनात चर्चा चालू असताना वक्त्यांची भराभर पोर्ट्रेट्स ते काढत असतात. असा खासदारांच्या स्केचेसचा आल्बमच ते बनवणार आहेत, अशीही माहिती नारायण यांनी पुरवली. अमृता प्रीतम, हुसेन हे सभागृहात बऱ्याचदा उपस्थित असलेले दिसतात.

हुसेन हे कधीच पादत्राणे वापरत नाहीत. संसदेतही ते अनवाणीच वावरताना दिसतात. हुसेन हे राज्यसभेचे सदस्य, पण चुकून एकदा ते लोकसभेतच जाऊन बसले होते.

या कलाकार मंडळींनी सभागृहात आतापर्यंत मौन धारण केले असले; तरी गेल्या १० डिसेंबर रोजी पंडित रविशंकर यांनी खासदार म्हणून आपले पहिले भाषण केले. रविशंकर साहजिकच संगीताबद्दल आत्मीयतेने बोलले. तरुणांनी केवळ रॉक, पॉप, डिस्को, चित्रपट संगीतात रमण्यापेक्षा त्यांना अभिजात संगीताचाही आस्वाद घेता यावा, म्हणून शाळांमधून अगदी नर्सरीपासून अभ्यासक्रमात संगीत हा सक्तीचा विषय ठेवावा, अशी रविशंकर यांनी सूचना केली. ताल, स्वर आणि लयबोध अशी संगीत शब्दावली वापरून रविशंकर यांनी आपला मुद्दा धिम्या लयीतच पण सुरेखपणे मांडला. त्यावेळी सभापती आर. वेंकटरामन यांना देखील राहवले नाही. ''सभापती हा अलिप्त असतो. त्याने कोणाच्या भाषणावर टाळ्या वाजवण्याची प्रथा नाही. परंतु आज मी नवी प्रथा सुरू करतो.'' असे म्हणून वेंकटरामन यांनी टाळ्या वाजवून दाद दिली.

□

**– अशोक जैन**

**('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)**